# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - १६०

## सभावृत्तांत

दिनांक - १७.०३.२०१० वेळ-दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक १७.०३.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे - सभापती
२. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
३. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
४. मा.रामदास तानाजी कुंभार
५. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
६. मा.सुमनताई मधुकर पवळे
७. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
८. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
९. मा.थोरात एकनाथ दादा
१०.मा.तानाजी विठ्ठल खाडे
११.मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबू नायर
१२.मा.गावडे जयश्री वसंत
१३.मा.सौ.वर्षा विलास मडीगेरी

याशिवाय मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.देशमुख,मा.गायकवाड,मा.कारचे,मा.गावडे, मा.भोसेकर,मा.मुंढे,मा.फडणीस-सहा.आयुक्त,मा.काळे-नगरसचिव,मा.चव्हाण-अति. शहर अभियंता,मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता,मा.पाटील-उपसंचालक नगररचना, मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.लोंढे-मुख्यलेखापाल, मा.थोरात,मा.निकम,मा.ढगे,मा.बनकर,मा.कुदळे,मा.कपिले,मा.सवणे,मा.दुधेकर, मा.जाधव,मा.चव्हाण-कार्य.अभियंता,मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.),मा.पोमण-संगणक अधिकारी,मा.सुर्यवंशी-कायदा सल्लागार,मा.गावडे-अग्निशामक अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-

विषय क्रमांक :-१८) मानधनावर घेणेबाबत - मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-१९) उच्च शिक्षणासाठी अर्थ सहाय्य मिळणेबाबत - मा. एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-२०) अ प्रभाग कार्यक्षेत्रातील स्वच्छतागृहांची साफसफाई करणेबाबत तसेच थेरगावमध्ये इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेबाबत - मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-२१) लॉन मुल्हर इले. मशिन खरेदी करणेबाबत - मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- २२) गार्डन देखभाल संरक्षणार्थ चालवण्यासाठी देणेबाबत - मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-२३) व्यायामशाळा देखभाल, संरक्षणकामी चालविणेस देणेबाबत - मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-२४) वॉर्डातील दैनंदीन साफसफाई करणेबाबत - मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-२५) वाय.सी.एम. रुग्णालयातील कॅंटीन चालविणेस देणेबाबत - मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक:-२६) कै.मधुकर पवळे क्रीडांगण से.क्र.२१ यमुनानगर निगडी येथे ध्वनीक्षेपण व प्रकाश व्यवस्था करणेचे कामाचा खर्च अदा करणेत आलेबाबत - मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-२७) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०७४५ रद्द करणेबाबत - मा.मनोहर पवार, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-२८) निविदा नोटीस क्रमांक ७/३/२००९-१० मधील कामाचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत...

विषय क्रमांक:-२९) पाणी मिटर बाबत - मा.प्रेमकुमार नायर,मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक:-३०) क्रीडा प्रबोधिनीकरीता साहित्य खरेदी करणेबाबत - मा.जितेंद्र ननावरे, मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

----------------------

ठराव क्रमांक :- १०७८५ विषय क्रमांक :- १
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - विद्युत
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विद्युत/नि/१अ/कावि/९४/१०दि.६/३/१०
विषय - निविदा नोटीस क्र.१०/७-०९/१० मधील कामाचे करारनामा करणेस मंजुरीबाबत...

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७८६ विषय क्रमांक :- २
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - विद्युत
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक - मा.मनोहर पवार
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विद्युत/नि/१अ/कावि/८७/१०दि.३/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.३/०९/१० मधील अ.क्र.४ अन्वये, मनपाच्या ब प्रभागा अंतर्गातील विकसीत असणाऱ्या उद्यानातील दिव्यांची व विद्युत साहित्यांची दोन वर्षा करिता देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.स्टार इलेक्ट्रीकल सर्व्हिसेस (नि.र.रू.१६,९८,७७५/- [र.रू.सोळा लाख अठ्ठ्यान्नव हजार सातशे पंच्याहत्तर] पेक्षा २०.२९ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७८७ विषय क्रमांक :- ३
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - विद्युत
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विद्युत/नि/१अ/कावि/८८/१०दि.३/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.३/०९/१० मधील अ.क्र.६ अन्वये, मनपाच्या क प्रभाग कार्यक्षेत्रातील सर्व उद्यानातील पंपाची दोन वर्षाकरिता देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.स्वरूप इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इंजि. (नि.र.रू. १४,९८,२७८/- [र.रू.चौदा लाख अठ्ठ्यान्नव हजार दोनशे अठ्ठ्याहत्तर] पेक्षा १६.९० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७८८ विषय क्रमांक :- ४
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - क प्रभाग
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक - मा.एकनाथ थोरात
संदर्भ:मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.कप्र/लेखा/नि.क/कावि/५२/१०दि.२/३/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.५५ अन्वये, वॉर्ड क्र.१९ मधील ठिकठिकाणचे रस्ते खडीमुरुम व बी.बी.एम.पध्दतीने दुरुस्त करणेकामी मे.एन.एन. शिंगाडे (नि.र.रू.३,७५,०००/- [र.रू.तीन लाख पंच्याहत्तर हजार] पेक्षा ४०.९ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७८९ विषय क्रमांक :- ५
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - कायदा
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक - मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कास/३/कावि/१४३/१०दि.३/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कायदा विभागाकडील वाहनाची नुकसान भरपाई या लेखाशिर्षावरून दावे खटले या संबंधी खर्च या लेखाशिर्षावर र.रू. ७,००,०००/- [र.रू.सात लाख] तरतूद वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७९० विषय क्रमांक :- ६
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - प्रशासन
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक - मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/८/कावि/११६१/१०दि.२/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.सी.एन.लांडगे, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांनी दिनांक ९/११/९५ ते दिनांक ३०/४/२००७ या कालावधीत प्र.प्रशासन अधिकारी, करसंकलन या पदाचा अतिरिक्त पदभार सांभाळले बद्दल त्यांना उक्त कालावधी मधील संभाव्य वेतानाच्या १० % दराने परंतू दरमहा रू.५००/- एवढ्या कमाल मर्यादेपर्यंत अतिरिक्त वेतन / विशेष वेतन मंजूर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७९१ विषय क्रमांक :- ७
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - दूरसंचार
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.दूरसंचार/६६/१० दि.३/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाची ४ प्रभाग कार्यालये व १५ विभागीय करसंकलन कार्यालया करिता मे.रिलायंन्स वल्ड यांचेकडील वायरलेस ब्रॉडबॅन्ड पुरविणेस व होणाऱ्या एकत्रित

र.रू.१,८५,२५०/- [र.रू.एक लाख पंच्याऐंशी हजार दोनशे पन्नास] चे खर्चास तसेच सदरची रक्कम आगावू अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७९२ विषय क्रमांक :- ८
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक - मा.मनोहर पवार
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१/कावि/१०७/१०दि.८/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांचे इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रे (fire extinguisher) साहित्य बसविणेबाबत ई-नि.क्र.२०/१-०९/१० अन्वये लघुत्तम निविदाकार मे.रेखा इंजिनिअरींग वर्क्स, चिंचवड यांचे अग्निशमन यंत्रे (fire extinguisher) साहित्याचे दर प्रति नग र.रू.१,३५७/- प्रमाणे ४१० नगाचे एकूण र.रू.५,५६,३७०/- रिफीलींग प्रति नग र.रू. २७०/- प्रमाणे १०० नगाचे एकूण र.रू.२७,०००/-, देखभाल दुरुस्ती प्रति नग र.रू.१७/- याप्रमाणे एकूण र.रू.६,११,२५०/- दर स्विकृत करून, करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७९३ विषय क्रमांक :- ९
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - वैद्यकीय
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/१अ/कावि/१४३/१०दि.५/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे तालेरा रूग्णालयात रेडिओलॉजिस्ट या पदाची आवश्यकता व वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून ही केवळ एकच अर्ज प्राप्त झालेमुळे डॉ.मल्होत्रा रितु सतिश यांना रेडिओलॉजिस्ट या मानधनाचे पदावर प्रतिमहा र.रू.१५,०००/- [र.रू.पंधरा हजार] एकत्रित मानधनावर प्रत्यक्ष रूजु दिनांका पासून सहा महिने कालावधीसाठी नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७९४ विषय क्रमांक :- १०
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - क प्रभाग
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक - मा.एकनाथ थोरात
संदर्भ:मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.कप्र/लेखा/नि.क/१५/कावि/४८/१० दि.२५/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, वॉर्ड क्र.९ बोऱ्हाडेवाडी व इतर ठिकाणी पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्ती व देखभालीची कामे करणेकामी मे.श्री कॉन्ट्रॅक्टर (नि.र.रू.९,१९,५४५/- [र.रू.नऊ लाख एकोणीस हजार पाचशे पंचेचाळीस] पेक्षा ३०.३० % कमी) या

ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७९५ विषय क्रमांक :- ११
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - क प्रभाग
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.कप्र/लेखा/नि.क/१५/कावि/५०/१० दि.२५/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-१० मधील अ.क्र.२ अन्वये, वॉर्ड क्र.२१ धावडेवस्ती व इतर ठिकाणी पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्ती व देखभालीची कामे करणेकामी मे.श्री कॉन्ट्रॅक्टर (नि.र.रू.९,३१,१६०/- [र.रू.नऊ लाख एकतीस हजार एकशे साठ] पेक्षा ३०.३० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७९६ विषय क्रमांक :- १२
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - विद्युत
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक - मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विद्युत/नि/१अ/कावि/९५/१०दि.६/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.३/०९/१० मधील अ.क्र.३ अन्वये, मनपाच्या ब प्रभाग कार्यक्षेत्रातील सर्व उद्याना तील पंपाची २ वर्षाकरिता देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.स्वरूप इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इंजि.(नि.र.रू.१९,९६,९८४/- [र.रू.एकोणीस लाख शहान्नव हजार नऊशे चौऱ्याऐंशी] पेक्षा १६.६५ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७९७ विषय क्रमांक :- १३
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - विद्युत
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विद्युत/नि/१अ/कावि/९६/१०दि.६/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.३/०९/१० मधील अ.क्र.५ अन्वये, मनपाच्या ड प्रभाग कार्यक्षेत्रातील सर्व उद्याना तील पंपाची दोन वर्षाकरिता देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.ओमकार इंजिनिअरिंग (नि.र.रू.१४,९९,५४५/- [र.रू. चौदा लाख नव्यान्नव हजार पाचशे पंचेचाळीस] पेक्षा १६.९९ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- १०७९८ विषय क्रमांक :- १४
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - क प्रभाग
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक - मा.मनोहर पवार
संदर्भ:मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.कप्र/लेखा/नि.क/१५/कावि/४५/१० दि.२२/२/१०
विषय-निविदा नोटीस क्र.१/८७-२००८-०९ या कामाचा करारनामा अवलोकनार्थ

विषय क्रमांक १४ पुढील सभेचे वेळी अवलोकनार्थ ठेवणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७९९ विषय क्रमांक :- १५
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - दूरसंचार
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.दूरसंचार/८०/१० दि.९/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन-

मनपाचे श्री.अशोक सुरगुडे-विकास अभियंता (वि/यां) व श्री.दिलीप गावडे-सहा.आयुक्त (ब प्रभाग) हे दोन वरिष्ठ अधिकारी यांस लॅपटॉप करिता मे.रिलांन्स वेब स्टोअर लि. यांचेकडील वायरलेस ब्रॉडबॅन्ड पुरविणेस व होणाऱ्या एकत्रित र.रू.१८,८९८/- [र.रू.अठरा हजार आठशे अठ्‌ठ्यान्नव] चे खर्चास तसेच हायस्पीड युएसबी हार्डवेअर करिता र.रू.३,९९८/- [र.रू.तीन हजार नऊशे अठ्‌ठ्यान्नव] प्रथम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. मा.प्रशांत शितोळे अध्यक्ष स्थायी समिती, मा.पक्षनेता, मा.विरोधी पक्षनेता व इतर मा.पदाधिकारी यांस कार्यालयीन कामकाजासाठी वायरलेस ब्रॉडबॅण्ड सुविधा पुरविणेस व येणाऱ्या संपूर्ण खर्चास व सदरची संपूर्ण रक्कम मे.रिलांन्स वेब स्टोअर लि. यांस प्रथम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८०० विषय क्रमांक :- १६
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - ब प्रभाग
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक - मा.एकनाथ थोरात
संदर्भ:मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.वि/बप्र/जा/१७७/१० दि.१०/३/१०

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.१७ बापदेवनगर मधील रस्ता रूंदीकरणातील मरावि विकंचे लघुदाब पोल व तारा हलविणे या कामाचे विज पर्यवेक्षण शुल्क र.रू.३१,३३५/- [र.रू.एकतीस हजार तीनशे पस्तीस] म.रा.वि.वि.कंपनीस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८०१ विषय क्रमांक :- १७
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - ब प्रभाग स्थापत्य
सुचक- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक - मा.जयश्री गावडे
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बप्र/३/कावि/२२०/१० दि.१०/३/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुळा नदीचे महत्तम पुररेषा आखणी सर्वेक्षण ६० टक्के क्षेत्र येत असल्याने पिं.चिं.म.न.पा. हद्दीतील सर्वेक्षणाचा खर्च र.रू. ३१,७७,९७९/- व इंद्रायणी नदीचे पुररेषा आखणीचे खर्च र.रू. ३६,१६,०००/- असे एकूण र.रू. ६७,९३,९७९/- पैकी मनपाने अद्यापपर्यंत र.रू.५८,९२,०००/- इतका निधी पुणे पाटबंधारे विभागास अदा केलेला असल्याने उर्वरित निधी र.रू.९,०१,९७९/- कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे-१. यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-

ठराव क्रमांक :- १०८०२ विषय क्रमांक :- १८
दिनांक- १७.०३.२०१०
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

खाली नमूद केलेल्या व्यक्तींस त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या पदी व मानधनावर सहा महिने कालावधीसाठी नेमण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

| नाव | पदनाम | र.रु. |
|---|---|---|
| १) डॉ.श्रद्धा सुधीर रत्नपारखी (दि.१८/८/२००९) | वैद्यकीय अधिकारी (ओ.पी.डी.) | १२,०००/- |
| २) संग्राम बबर चौगुले | क्रीडा प्रशिक्षक | १५,०००/- |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८०३ विषय क्रमांक :- १९
दिनांक- १७.०३.२०१०
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या महिला बालकल्याण योजनेअंतर्गत १२वी नंतरचे वैद्यकीय अभियांत्रिकी, संगणक प्रथम वर्ष पदवी परीक्षा यासारखे उच्च शिक्षण घेणाऱ्या युवतींना अर्थसहाय्य देणेत येते. सदर योजनेची अर्ज स्वीकृतीची मुदत संपलेली आहे. परंतु कु.हेजल राजकुमार कन्नन,कु.नम्रता भास्कर बोरोले,कु.पल्लवी रवींद्र बनसोड या विद्यार्थीनी मुदतीत अर्ज सादर करु शकल्या नाहीत. या विद्यार्थीनींना कॉम्प्युटर इंजिनिअरींग या शाखेला प्रथम वर्षाला प्रवेश मिळालेला असून योजनेच्या नियमाप्रमाणे या आर्थिक वर्षात त्यांना अर्थ सहाय्य मिळाले नाही तर त्या आर्थिक

सहाय्यापासून वंचित राहतील. तरी या विद्यार्थीनींचे अर्ज मुदतीनंतर स्विकारुन त्यांना अर्थसहाय्य अदा करणेबाबत येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८०४ विषय क्रमांक :- २०

दिनांक- १७.०३.२०१०

सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके

संदर्भ:मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

अ प्रभाग कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.४६ व ४७ या प्रभागातील स्वच्छतागृहांची साफसफाई व देखभाल पुढील दोन वर्षांकरिता अनुदान तत्वावर सुर्योदय स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था, पिंपरी यांचेकडुन करुन घेण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. मनपाचे स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. १७/२००९-२०१० मधील अ.क्र.१६ अन्वये, थेरगाव वॉर्ड क्र.८५मध्ये गल्लीबोळात इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेकामी मे.सांडभोर कन्स्ट्रक्शन (निविदा र.रु.२८,८५,१२१/- [अठ्ठावीस लाख पंच्याऐंशी हजार एकशे एकवीस] पेक्षा ४३.११% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.१६,४१,३४५/- [सोळा लाख एकेचाळीस हजार तिनशे पंचेचाळीस] पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा रकमेच्या १०% पर्यंत निविदा अटीप्रमाणे डांबर,सिमेंट,लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८०५ विषय क्रमांक :- २१

दिनांक- १७.०३.२०१०

सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके

संदर्भ:मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

म.न.पा.चे उद्यान विभागास यापूर्वी उत्पादीत कंपनी मे.रेखा इंजि.वर्क्स, चिंचवड यांनी पुरविलेल्या लॉन मुव्हर मिशनचा दर्जा चांगला असल्याने सध्या उद्यान विभागांस आवश्यक असणाऱ्या लॉन मुव्हर इले. मशिन (अतिरिक्त ५ ब्लेडसह) प्रति नग र.रु.३८,५००/- या दराने निविदा न मागविता थेट पद्धतीने मे.रेखा इंजि.वर्क्स, चिंचवड यांचेकडून खरेदी करणेस व त्याप्रमाणे येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८०६ विषय क्रमांक :- २२
दिनांक- १७.०३.२०१०
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

ब प्रभागमधील १) खैरे हॉस्पीटल उद्यान २) सिल्व्हर उद्यान ३) राजश्री शाहू उद्यान बिजलीनगर गार्डन अजित स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित चिंचवडगाव यांना पाच वर्षांसाठी योग्य त्या सेवाशुल्क तत्वावर देखभाल व संरक्षणार्थ चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८०७ विषय क्रमांक :- २३
दिनांक- १७.०३.२०१०
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

आकुर्डीगाव येथील कै.कैलास शंकरराव पांढरकर व्यायामशाळा, यश सोशल फाऊंडेशन यांस द.म.र.रु.१९००/- सेवाशुल्क तत्वावर १५ वर्षे कालावधीसाठी देखभाल,संरक्षण,चालविणेकामी देण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८०८ विषय क्रमांक :- २४
दिनांक- १७.०३.२०१०
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

खाली नमुद केलेल्या संस्थांकडून त्यांचे नावासमोर नमूद केलेल्या वॉर्डातील दैनंदीन साफसफाई करुन घेणेकामी लागणारे आवश्यक ते स्वयंसेवक किमान वेतन दराने उपलब्ध करुन घेउन त्यांचेकडून पुढील ३ वर्ष कालावधीत दैनंदीन साफसफाई करुन घेण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | अजित स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था | ४८ |
| २) | राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था | ५९ |
| ३) | स्वामी विवेकानंद स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था | ४ |
| ४) | जनसेवा स्वयंरोजगार सेवा सह. संस्था मर्या. | ४६,४७ |
| ५) | कै.नागनाथआप्पा मठपती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था साईमंदीर-बापुजीबुवानगर) | ८३ |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०८०९ विषय क्रमांक :- २५
दिनांक- १७.०३.२०१०
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक-९२१४,दिनांक २८/०२/२००५ नुसार वाय.सी. एम. रुग्णालयामधील राखून ठेवण्यात आलेल्या नियोजित जागेमध्ये कँटीनची व्यवस्था मे.क्वॉलिटी केटरर्स,चिंचवडगांव,पुणे-३३,यांचेकडून प्राप्त झालेल्या निविदेतील पदार्थाचे दर स्विकृत करुन त्यांचेशी दिनांक २८/०६/२००५ रोजी करारनामा करुन र.रु.५८,०००/- अनामत रक्कम घेवून ठेकेदारी पद्धतीने ५ वर्षे चालविण्यास देण्यास व त्यांचेकडून कँन्टीनची ठेका फी म्हणून प्रति महिना र.रु.१९,२५०/- वसुल करण्यास व कँन्टीन चालविण्यास देण्यास मऔभां/३/कावि/४९२/२००५, दिनांक १६/०७/२००५ नुसार आदेश देण्यात आला होता. सदर आदेशाची मुदत दिनांक २०/०४/२०१० रोजी संपत आहे. त्यांनी नियोजित जागेतील कँटीन स्थानांतर करुन वाय.सी.एम. रुग्णालयाच्या ओपीडीच्या बाजूला सुरु केलेले आहे व मुळ जागा मध्यवर्ती औषध भांडारास वापरास दिलेली आहे. ते कँटीनची व्यवस्था समाधानकारकरित्या चालवित असल्याने त्यांचा पुर्वानुभव विचारात घेता सदरचे कँटीन र.रु.७५,०००/- अनामत रक्कम घेवून पुढील ५ वर्षे कालावधीकरीता पुर्व मंजुर दराने करारनामा करुन निविदा न मागविता परंतू ठेका फी म्हणून प्रति महिना त्यांचेकडून र.रु.२५,०००/- वसुल करुन त्यांना चालविणेस देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक :- १०८१० विषय क्रमांक :- २६
दिनांक- १७.०३.२०१०
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.एकनाथ थोरात, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

अ प्रभाग कार्यक्षेत्रातील महापौर चषक जिल्हास्तर कबड्डी स्पर्धा-२०१० करीता कै.मधुकर पवळे क्रीडांगण से.क्र.२१ यमुनानगर निगडी येथे तात्पुरत्या स्वरुपात ध्वनीक्षेपण व प्रकाश व्यवस्था करणेचे कामाचा खर्च र.रु.५०,०००/- एजन्सी मे.मोरया मंडप डेकोरेटर्स,चिंचवड यांना निविदा क्र.१/७५-०८/०९ अन्वयेचे मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.६८७३ दि.२३/१२/०८ अन्वयेचे पुर्व स्विकृत निवीदा दर At par या दराने अनामत रक्कम न घेता व करारनामा न करता अदा करण्यात आला असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक :- १०८११ विषय क्रमांक :- २७
दिनांक- १७.०३.२०१०
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.मनोहर पवार, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.१०७४५ दिनांक २६.२.२०१० रद्द करण्यात येत आहे. त्यामधील विषयांकित कामासाठी फेरनिवीदा काढून जरुर तो प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- १०८१२ विषय क्रमांक :- २८
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - पाणीपुरवठा
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/नि/कावि/११७/१० दि.१७/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.७/२००९-१० मधील अ.क्र.३ अन्वये, ब प्रभाग कार्यक्षेत्रातील एम.एस.जलवाहिन्याची देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.विश्वेश एंटरप्रायजेस (नि.र.रू.२३,२६,७७३/- [र.रू.तेवीस लाख सव्वीस हजार सातशे त्र्याहत्तर] पेक्षा २६% कमी) या ठेकेदाराकडून कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- १०८१३ विषय क्रमांक :- २९
दिनांक- १७.०३.२०१०
सुचक- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:मा.प्रेमकुमार नायर,मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

ज्या मिळकतीस पाणी मिटर बसविलेले नाहीत त्यास १ एप्रिल २०१० पासून ३० जून २०१० पर्यंत पाणी मिटर बसविण्यात यावेत व गत वर्षीचे दुप्पट बील न आकारता पूर्वीप्रमाणे बीले आकारण्यात यावीत. सदर कालावधीतही पाणीमिटर न बसविल्यास पुढील वर्षी दुप्पट बील आकारण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक :- १०८१४ विषय क्रमांक :- ३०
दिनांक- १७.०३.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:मा.जितेंद्र ननावरे,मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव...

मनपाच्या माध्यमिक शिक्षण विभागामार्फत उद्यमनगरी येथे क्रीडा प्रबोधिनी विद्यालय सुरु करण्यात आलेले असून या विद्यालयातील खेळाडू शालेय, फेडरेशन तसेच निमंत्रित क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होतात. क्रीडा क्षेत्रामध्ये मे.स्पोर्टस ऑथोरिटी ऑफ इंडिया, मुंबई ही संस्था केंद्र सरकार मान्यताप्राप्त असून त्यांचेकडे

क्रीडा क्षेत्रातील सर्व साहित्याचे मंजूर दर,मंजूर कंपनी, त्यांचे स्पेसिफिकेशन असतात. सदर विद्यार्थी/खेळाडू यांना केंद्र सरकार मान्यता प्राप्त क्रीडा संस्था मे.स्पोर्टस ॲथोरिटी ऑफ इंडिया,मुंबई यांचे मान्यता प्राप्त असलेल्या उत्पादीत कंपनीकडून त्यांचे दरानुसार मुख्याध्यापक क्रीडा प्रबोधिनी यांचे मागणीनुसार टी शर्टस,शॉर्टस,ट्रॅक सुट,स्पोर्टस शूज इ. साहित्य निविदा व कोटेशन न मागविता थेट पद्धतीने त्यांचे मान्य दरात खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे र.रु.७,००,०००/- अथवा प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(शितोळे प्रशांत कृष्णराव)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/९/कावि/३९६/२०१०
दिनांक - १८/०३/२०१० चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.